जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017
पुढारी

# देशातील ३२ संस्थांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश

**कोल्हापूर : विजय पाटील**

देशातील वीस शैक्षणिक संस्था जागतिक दर्जाच्या बनविण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच केली. यानुसार देशभरातून निवड केलेल्या विद्यापीठांना पंधरा वर्षांसाठी प्रत्येकी विविध सुविधांसह एक हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. या वीस संस्थांचा शोध गुणवत्तेनुसार राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानकडून (रुसा) सुरू आहे. सध्या देशभरातील बत्तीस शैक्षणिक संस्थांची लघु यादी करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ या दोन संस्थांचा समावेश आहे. वर्ल्डक्लास इन्स्टिट्यूशनच्या यादीत देशातील शैक्षणिक संस्थांचा समावेश व्हावा, यासाठी केंद्र सरकारकडून पंधरा वर्षांचा नियोजनबद्ध आराखडा बनवण्यात आला आहे. यासाठी देशातील वीस गुणवत्तापूर्ण संस्थांची निवड केली जात आहे. या संस्थांना विविध सुविधा देण्यासह एक हजार कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे.

- जागतिक दर्जाचे विद्यापीठ बनवण्यासाठी निवड प्रक्रिया
- ३२ पैकी २० संस्थांची अंतिम यादी

या सुविधांचा वापर करून जागतिक नामावलीत या संस्थांना स्थान मिळावे, हा हेतू यामागे आहे. देशभरात संशोधन आणि गुणवत्तेबाबत गतसाली 'एनआयआरएफ'च्या यादीत शिवाजी विद्यापीठाने अठ्ठावीसाव्या क्रमांकावर स्थान मिळवले होते.

याबाबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, देशातील बत्तीस विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश होणे ही अभिमानास्पद बाब आहे. प्रत्येक विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी या सर्वांचाच हा सन्मान आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह यापूर्वीच्या कुलगुरूंनी केलेल्या कामाचाही हा गौरव आहे. आम्ही वीस संस्थांच्या यादीत समावेशासाठी प्रयत्न करत आहोत.

1 NOV 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी रणांगण तापले

## एकूण ४४६ इच्छुकांचे विक्रमी अर्ज; सात अभ्यासमंडळांसाठी एकही उमेदवारी अर्ज नाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मंगळवारी अखेरच्या दिवशी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी झाली. आजअखेर विविध गटांत एकूण ४४६ इच्छुकांनी विक्रमी अर्ज दाखल केले. अनेकांनी शक्तिप्रदर्शनाने अर्ज दाखल केले तर अनेकांनी बंडखोरीचे निशान फडकावून गटप्रमुखांच्या मर्जीविरोधात अर्ज दाखल केले. इच्छुकांची संख्या वाढल्याने आता दोनपेक्षा जास्त पॅनेल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनेक इच्छुकांनी आता थेट प्रचारास सुरुवात केली. तर एकास एक लढत व्हावी, म्हणून प्रस्थापित पॅनेलप्रमुखांकडून इच्छुकांना अर्ज माघारीसाठी दबाव टाकायला सुरू केली आहे.

### सात अभ्यासमंडळांसाठी एकही अर्ज नाही

विद्यापीठ निवडणुकीतील सात अभ्यासमंडळांसाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही. त्यामुळे या जागांबाबत आता निवडणूक अधिकारी म्हणून अधिकाऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन मागवून निर्णय घ्यावा लागणार आहे. दैनिक 'पुढारी'ने याबाबत ३० ऑक्टोबरच्या अंकात कोणी उमेदवारी घेता का उमेदवारी? या मथळ्याखाली व्यक्त केलेला अंदाज खरा ठरला आहे.

### पदवीधर गटांत सर्वाधिक इच्छुक

नोंदणीकृत पदवीधरांच्या दहा जागांसाठी १२३ इतके उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. तसेच विद्यापीठ शिक्षकांच्या ३ जागांसाठी २७ अर्ज दाखल झाले.

### विभागवार जागा आणि कंसात दाखल अर्ज

अधिसभा

● प्राचार्य- १० (३९) ● व्यवस्थापन प्रतिनिधी-६ (३२) ● शिक्षक-१० (४७) ● विद्यापीठ शिक्षक-३ (२७) ● नोंदणीकृत पदवीधर-१० (१२३) ● विद्या परिषद शिक्षक-८ (३०) ● अभ्यास मंडळे-३३ (१५८)

विद्यापीठाच्या विविध विभागांच्या जागांसाठी सकाळपासून उमेदवारी अर्ज भरले जात होते. विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, सुटा, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सुफ्टा, आदी संघटनांच्या इच्छुकांनी अर्ज भरले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत अर्ज भरण्यात आले. ही निवडणूक दुरंगी होईल, असा अंदाज होता. मात्र, इच्छुकांची संख्या वाढल्याने गटबाजीला उधाण आले आहे. याचा परिणाम एकाच संघटनेत इच्छुकांमध्ये दोनहून अधिक गट कार्यरत झाले आहेत. त्यामुळे विविध स्तरांवर माघारीसाठी प्रयत्न केले जात आहेत. २ नोव्हेंबरला छाननी होणार असून ४ नोव्हेंबरपर्यंत माघारीची मुदत आहे.

1 NOV 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभा निवडणुकीसाठी चुरस

## ४४६ अर्ज दाखल; शिवाजी विद्यापीठामध्ये उमेदवार, समर्थकांची गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सर्वाधिक १२३८ अर्जांची विक्री झाली. विविध गटांसाठी एकूण १४६ जागांसाठी ४४६ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांच्या छाननीची प्रक्रिया उद्या, गुरुवारी होणार आहे.

या निवडणुकीच्या रिंगणात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीसह काही अपक्ष उतरले आहेत. या निवडणुकीतील विविध गटांसाठी उमेदवारी अर्ज विक्री आणि स्वीकृतीची मंगळवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत अंतिम मुदत होती. या मुदतीपर्यंत एकूण १२३८ अर्जांची विक्री झाली आहे. विविध गटांतर्गत एकूण ४४६ अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये प्राचार्य (३९ अर्ज), व्यवस्थापन प्रतिनिधी (३२), शिक्षक (४७), विद्यापीठ शिक्षक (२७), नोंदणीकृत पदवीधर (१२३), विद्यापरिषद-शिक्षक (२०) आणि अभ्यास मंडळे-विभागप्रमुख (१५८) यांचा समावेश आहे. यात नोंदणीकृत पदवीधर गटातील दहा जागांसाठी सर्वाधिक १२३ अर्ज दाखल झाले आहेत. सोमवारी (दि. ३०) बहुतांश उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. कागदपत्रांअभावी, काही तांत्रिक अडचणींमुळे मागे ठेवण्यात आलेले उमेदवारी अर्ज अनेकांनी मंगळवारी भरले. अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने सकाळी अकरानंतर इच्छुक उमेदवार, त्यांच्या समर्थकांची अर्ज भरण्याची धावपळ सुरू होती.



कोल्हापुरात मंगळवारी शिवाजी विद्यापीठ अधिसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी विद्यापीठातील निवडणूक विभागाच्या कक्षात उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी गर्दी केली होती.

### निवडणुकीचा पुढील कार्यक्रम असा

- उमेदवारी अर्जांची छाननी : उद्या, गुरुवारी
- उमेदवारी अर्ज माघार घेणे : ४ नोव्हेंबर
- पात्र उमेदवारांच्या यादीची प्रसिद्धी : ६ नोव्हेंबर
- मतदान : १७ नोव्हेंबर
- मतमोजणी आणि निकाल : २० नोव्हेंबर

1 NOV 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिकार मंडळांसाठी एक हजार २३८ अर्जविक्री

## ४४६ अर्ज दाखल : उद्या छाननी प्रक्रिया; कागदपत्रांसाठी इच्छुकांची पळापळ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी तब्बल एक हजार २३८ अर्जांची विक्री झाली असून, आजअखेर ४४६ अर्ज दाखल झाले. निवडणुकीतील विविध गटांसाठी उमेदवारी अर्जविक्री आणि स्वीकृतीसाठी आज अखेरची मुदत होती. छाननीची प्रक्रिया गुरुवारी (ता. २) होणार आहे.

**प्रक्रिया अशी होणार**

- २ नोव्हेंबर- अर्जांची छाननी
- ४ नोव्हेंबर- माघारीची मुदत
- ६ नोव्हेंबर- पात्र उमेदवार यादी
- १७ नोव्हेंबर- मतदान
- २० नोव्हेंबर- मतमोजणी



शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीसह काही अपक्षांनी निवडणुकीत शड्डू ठोकला आहे. दाखल अर्जात प्राचार्य (३९ अर्ज), व्यवस्थापन प्रतिनिधी (३२), शिक्षक (४७), विद्यापीठ शिक्षक (२७), नोंदणीकृत पदवीधर (१२३), विद्या परिषद-शिक्षक (२०) आणि अभ्यास मंडळे-विभागप्रमुख (१५८) यांचा समावेश आहे.

गतवेळच्या निवडणुकीपेक्षा यंदा उमेदवारी अर्जविक्री आणि स्वीकृतीची संख्या अधिक असल्याने निवडणुकीत रंगत येणार आहे. काल (ता. ३०) मोठ्या प्रमाणात अर्जांची विक्री झाली. तांत्रिक कारणास्तव काल ज्यांना अर्ज दाखल करता आले नाहीत, त्यांनी ते आज अर्ज दाखल केले.

अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस असल्याने उमेदवारांसह त्यांच्या समर्थकांची कागदपत्रांची जुळवाजुळव आणि इतर माहिती भरण्यासाठी धावपळ सुरू होती. काही उमेदवारांनी विद्यापीठात येऊन, तर काहींनी इतरांना अधिकारपत्र देऊन अर्ज दाखल केले.

**३३ अभ्यास मंडळे**

एकूण ३३ अभ्यास मंडळांवरील १४६ जागांसाठी निवडणूक होत आहे. त्यातील अधिसभेसाठी शिक्षक, प्राचार्य आणि नोंदणीकृत पदवीधर गटासाठी प्रत्येकी दहा जागा, संस्था प्रतिनिधींच्या सहा, विद्यापीठ कॅम्पवरील शिक्षकांच्या तीन जागा आहेत. त्यासह विद्या परिषदेसाठी शिक्षक गटातील आठ जागा आहेत. विविध विद्याशाखांच्या एकूण ३३ अभ्यास मंडळांवरील प्रत्येकी तीन अशा एकूण ९९ जागांचा समावेश आहे.

1 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी १२३८ अर्ज

## अर्जांची उद्या छाननी : अर्ज भरण्यासाठी गर्दी, सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढण्याचा काही संघटनांचा निर्धार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. दिवसभर प्राध्यापक, संस्थाचालक, प्राचार्य, आणि विद्यार्थ्यांची अर्ज भरण्यासाठी धावपळ सुरु होती. गुरुवार २ रोजी अर्जांची छाननी केली जाणार आहे. तर ४ रोजी अर्ज माघार घेण्यात येणार आहेत. त्यामुळे अर्ज माघारीनंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे. शेवटच्या दिवशी १ हजार २३८ अर्ज दाखल झाले.

अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने विद्यापीठ विकास आघाडी, सुटा संघटना, आजी-माजी विद्यार्थी संघटना आणि विद्यापीठ विकास मंचतर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील उमेदवारांचे अर्ज दाखल केले. विद्यापीठ परिसरात दिवसभर प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. विद्यापीठ विकास आघाडी अंतर्गत सर्वच अधिकार मंडळासाठी अर्ज दाखल झाले आहेत. तर सुटा अंतर्गत पदवीधर सोडून इतर जागांसाठी अर्ज दाखल झाले. आजी-माजी विद्यार्थी संघटना पदवीधरच्या १० जागा लढवणार आहे. तर विद्यापीठ विकास मंचने सर्वच अधिकार मंडळासाठी अर्ज दाखल केले



आहेत. विद्यापीठ विकास आघाडीतून बाहेर पडून आपली स्वतंत्र चूल मांडण्याचा प्रयत्न विद्यापीठ विकास मंचने सुरू केला आहे. यामध्ये बऱ्याच लहान-मोठ्या संघटनांचा समावेश आहे. असे असले तरी विद्यापीठ विकास आघाडीची ताकद मोठी असल्याने मिळतील त्या जागेवर विद्यापीठ विकास मंचला समाधान मानावे लागणार आहे, अशी चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. काही संघटनांमधील प्राध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी बंडखोरी करण्याची दाट शक्यता आहे. म्हणून विद्यापीठ निवडणूक तिरंगी किंवा पंचरंगी होण्याची शक्यता आहे.

### विद्यापीठ विकास मंचचा निर्णय कोअर कमिटीच घेणार

गेल्या १० वर्षापासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची विद्यापीठ विकास आघाडीबरोबर युती आहे. यावर्षी मात्र जागा वाटपावरून या दोन संघटनांमध्ये अंतर्गत कलह सुरू आहे. त्यामुळे विद्यापीठ निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ मंचची स्थापना करण्यात आली असून, यामध्ये अभाविपशी निगडीत जवळपास २० ते २५ संघटनांचा समावेश आहे. या संघटनेने कोअर कमिटीची स्थापना केली असून निवडणुकीसंदर्भात ही कोअर कमिटी विद्यापीठ विकास मंच, उमेदवार आणि संघटनेतील कार्यकर्त्यांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेणार आहे. निवडणुकीमध्ये विद्यापीठ विकास मंच कोणत्याही पक्षाचा किंवा नेत्याचा झेंडा मिरवणार नसल्याची माहिती अधिकृत सुत्रांनी दिली.

### सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी मोडीत काढण्याचा निर्धार

सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी मोडीत काढण्याचा निर्धार काही संघटनांनी केला आहे. त्यामुळे सर्वच जागांसाठी अर्ज भरून दबाव तंत्राचा वापर करण्यात येत आहे. सत्ताधारी पक्षाने समन्वयाची भूमिका घेवून जागा वाटपात योग्य भूमिका घेतली नाही, तर आम्ही आमची स्वतंत्र चूल मांडणार असल्याचा निर्णय या संघटनांच्या नेत्यांनी घेतला आहे. अर्ज छाननीनंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असेही या संघटनेच्या नेत्यांनी सांगितले.

### शारीरिक शिक्षण शिक्षक संघ पहिल्यांदाच निवडणूक रिंगणात

वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ विद्यापीठाच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच अधिसभेच्या निवडणुक रिंगणात उतरला आहे. या संघटनेतर्फे प्राध्यापक प्रतिनिधीच्या जागेसाठी प्रा. एन. डी. बनसोडे, प्रा. संजय पाटील, डॉ. महेश पाटील, प्रा. समीर पवार यांचे अर्ज दाखल करण्यात आले आहेत. क्रीडा विभागाच्या शिक्षकांना जमेत धरले जात नसल्याने या संघटनेने आपला प्रतिनिधी सिनेटमध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

### निवडणूक कार्यक्रम :

उमेदवारी अर्ज छाननी - २ नोव्हेंबर.
उमेदवारी अर्ज माघार - ४ नोव्हेंबर. सायं. ५ पर्यंत.
पात्र उमेदवारांची यादी - ६ नोव्हेंबर.
मतदान - १७ नोव्हेंबर सकाळी ९ ते सायं. ५ पर्यंत.
मतमोजणी - २० नोव्हेंबर रोजी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठ निवडणूक, १२३८ अर्जांची विक्री

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसह अन्य अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी मंगळवारी अर्ज खरेदीचा आणि जमा करण्याचा शेवटचा दिवस होता. मंगळवारपर्यंत १२३८ अर्जांची विक्री झाली, तर सर्व गटातून एकूण ४४६ अर्ज दाखल करण्यात आले. दरम्यान, सात अभ्यास मंडळांच्या जागांसाठी एकही अर्ज दाखल झाला नाही. मंगळवारपर्यंत एकूण दाखल झालेल्या अर्जांमध्ये प्राचार्य गटातून ३९, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून ३२, शिक्षक गटातून ४७, विद्यापीठ शिक्षक गटातून २७, नोंदणीकृत पदवीधरमधून १२३, अभ्यास मंडळे-विभागप्रमुख गटातून १५८ आणि विद्या परिषद-शिक्षक गटासाठी २० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. गुरुवारी दाखल उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. यंदाच्या निवडणुकीमध्ये अर्जांच्या प्रचंड संख्येमुळे रंगत निर्माण झाली आहे. अर्ज माघारीनंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# सिनेट निवडणुकीत लक्ष माघारीकडे

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी एकूण ४४६ अर्ज दाखल झाले. ३१ ऑक्टोबरला अर्ज भरण्याच्या अखेरच्यादिवशी सकाळपासूनच इच्छुकांच्या गर्दीने शिवाजी विद्यापीठ परिसर फुलून गेला.

निवडणुकीच्या निमित्ताने झालेल्या आघाडीतील इच्छुकांसह विविध गटातील उमेदवारीसाठी मातब्बरांनी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान शनिवारी ४ नोव्हेंबर रोजी अर्ज माघारीची अंतिम मुदत आहे. अर्ज दाखल करून रिंगणात आलेल्या उमेदवारांपैकी कोण माघार घेणार आणि कोण निवडणूक लढवणार हे चित्र माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे. अन्य गटातील मातब्बर उमेदवारांच्या माघारीसाठी मोर्चेबांधणीला येत्या चार दिवसांत वेग येण्याची शक्यता आहे.

**मंगळवारी ४४६ अर्ज दाखल**

अभ्यासमंडळ गटातून सर्वाधिक १५८ अर्ज दाखल झाले. तर प्राचार्य गटातून ३९, व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून ३२, शिक्षक गटातून ४७, विद्यापीठ शिक्षक गटातून २७ नोंदणीकृत पदवीधर गटातून १२३ तर विद्यापरिषद गटातून २० इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. कुलगुरू नियुक्त सदस्यांव्यतिरिक्त उर्वरित जागांसाठी दाखल झालेल्या ४४६ उमेदवारांपैकी माघार कोण घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

विद्यापीठातील एकूण चार विद्या शाखांतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड केली जाणार आहे.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाच्या अधिकार मंडळांवर विद्यापीठ विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांना संधी मिळेल. संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नोंदणीकृत पदवीधर अशा गटातून किमान प्रत्येकी एका महिलेला संधी देण्याची तरतूद आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या अधिकार मंडळावर महिलांना काम करण्याची संधी मिळेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 NOV 2017
पुढारी

# विद्यापीठात प्रशासकीय गुणवत्ता अभियानास प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून प्रशासकीय गुणवत्ता अभियानास प्रारंभ झाला. अभियान ७ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. याच काळात स्वच्छता सप्ताहाची अंमलबजावणी केली जाणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या गुणवत्ता अभियानास सुरुवात झाली आहे. यानुसार पन्नासहून अधिक विभागांचे कामकाज तपासले जाणार आहे. यामध्ये कार्यालयीन दप्तर निकषांतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संपूर्ण तपशील आणि कामकाजाची माहिती, शिकवले जाणारे अभ्यासक्रम व पेपर्सचे रेकॉर्ड, विद्यार्थ्यांचे जनरल रजिस्टर, विद्यापीठाचे कामकाज तसेच नावीण्यपूर्ण प्रयोग आदींसह साठा नोंद वही, डेड स्टॉक नोंद वही आदी बाबींची तपासणी नियुक्त समितीकडून यावेळी केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 1 NOV 2017
पुण्यनगरी


# वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभरात राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत शिवाजी विद्यापीठामध्ये 'रन फॉर युनिटी' रॅलीचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते 'फ्लॅग-ऑफ' करून रॅलीस प्रारंभ झाला. मुख्य प्रशासकीय इमारतीपासून संपूर्ण कॅम्पसमध्ये ही फेरी काढण्यात आली. सांगता झाल्यानंतर विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी एकता आणि एकात्मतेची शपथ दिली. रॅलीमध्ये प्रभारी वित्त आणि लेखाधिकारी अजित चौगुले, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017

सकाळ




कोल्हापूर : म्हैसूर येथील परिषदेत अनिस शेख यांना गौरविताना मान्यवर.

# म्हैसूर राष्ट्रीय परिषदेत अनिस शेख यांचे यश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी अनिस असीफ शेख यांनी म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. म्हैसूर (कर्नाटक) येथील विद्या विकास इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (व्ही. व्ही.आय.ई.टी.) संस्थेत न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर्स यावर राष्ट्रीय परिषद झाली.

परिषदेत श्री. शेख यांनी सुपर कॅपॅसिटरचे अणुउद्योगातील वाढते महत्त्व यावर पोस्टर प्रेझेंटेशन केले. यामध्ये त्यांनी अणुऊर्जा उद्योगामध्ये ऊर्जा साठवणुकीची वाढीव क्षमता असलेल्या सुपर कॅपॅसिटरचे औद्योगिक महत्त्व स्पष्ट केले. पदार्थविज्ञान विभागातील प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या त्यांच्या या पोस्टरला प्रथम क्रमांक मिळाला. परिषदेचे समन्वयक डॉ. सी. निंगप्पा, आयएनएस म्हैसूरचे सचिव डॉ. धवमणी, डॉ. सोनकवडे यांच्या उपस्थितीत श्री. शेख यांना हा पुरस्कार प्रदान केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017
पुण्यनगरी

# म्हैसूरच्या राष्ट्रीय परिषदेत अनिस शेख यांच्या पोस्टर प्रेझेंटेशनला प्रथम क्रमांक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील संशोधक विद्यार्थी अनिस असिफ शेख यांनी म्हैसूर येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेतील पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

म्हैसूर (कर्नाटक) येथील विद्या विकास इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (व्हीव्हीआयईटी) या संस्थेत २६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने 'सॉलिड स्टेट न्यूक्लिअर डिटेक्टर्स' या विषयावर २० वी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत अनिस असिफ शेख यांनी 'सुपर-कॅपॅसिटरचे अणुउद्योगातील वाढते महत्त्व' या विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन केले. यामध्ये त्यांनी अणुऊर्जा उद्योगामध्ये ऊर्जा साठवणुकीची वाढीव क्षमता असलेल्या सुपर-कॅपॅसिटरचे औद्योगिक महत्त्व स्पष्ट केले. उच्च ऊर्जा धारण क्षमतेबरोबरच सुरक्षा, अल्प मेंटेनन्स आणि प्रचलित बॅटऱ्यांपेक्षा अधिक पर्यावरणपूरक आदी वैशिष्ट्ये त्यांनी यात अधोरेखित केली.

पदार्थविज्ञान विभागातील प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या त्यांच्या या पोस्टरला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. परिषदेच्या समारोप समारंभात कुवेंपू विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. पी. वेंकटरामय्या यांच्या हस्ते, तर व्हीव्हीआयईटीचे प्राचार्य डॉ. एम. रविशंकर, इंटरनॅशनल न्यूक्लिअर ट्रॅक सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर.. पी. चौहान, परिषदेचे समन्वयक डॉ. सी. निंगप्पा यांच्या उपस्थितीत शेख यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 NOV 2017
सकाळ

# इचलकरंजीत दोन दिवस कबड्डी स्पर्धा

इचलकरंजी, ता. ३१ : येथील नाईट कॉलेज व रोटरी क्लब, हेरिटेज यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (ता. १) आणि गुरुवारी (ता. २) शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रांत ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील १२ संघ सहभागी होणार आहेत.